# महिला सबलीकरण व योजना

**डॉ. अषोक भाऊराव माळषिखरे**
**अर्थषास्त्र विभाग**
**आनंदराव धोंडे ऊर्फ**
**बाबाजी महाविद्यालय, कडा**
**ता. आश्टी जि. बीड**

**सारांष (गोशवारा):**

संपुर्ण जगामध्ये महिला सबलीकरण हा विशय महत्वाचा विशय म्हणून समोर आला आहे. स्त्री सबलीकरणासाठी जागतिक पातळीवर, राज्यपातळीवर, गावपातळीवर, षासकीय, प्रषासकीय, सामाजिक, राजकीय क्षेत्रात घटनात्मक तरतुदी करुन त्यांची अमंलबजावणी केल्यास स्त्री सबलीकरणाला चालना मिळेल. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा असलेल्या महाराश्ट्रात महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण प्रदान करुन महिलांना सबलीकरणाच्या माध्यमातुन समाजाच्या मुख्यप्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्ताविकः**

भारत कृशी प्रधान देष म्हणून ओळखला जातो. कृशीप्रधान देषात गावागावामध्ये षहरामध्ये महिला घरातील कामाबरोबरच पुरुशांबरोबर नोकरीमध्ये काम करतांना दिसून येतात. परंतू महिलांना स्वायत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली परंतू महिला खरोखरच अबला आहेत का व त्यांना सबला बनविण्याची गरज आहे का?

जगामध्ये भारत देष विविध परंपरा, संस्कृती यामुळे ओळखला जातो. पुरातन काळापासून महिलांना देवीचे रुप मानुन पुजनीय मानले आहे. परंतू देषात महिला समाजाच्या बंधनात अडकून पडल्या आहेत. त्यांना दुय्यम स्थान दिले जाते त्यांचे अधिकार हिरावून घेतले जातात, तरीसुध्दा समानतेच्या गोश्टी बोलल्या जातात. असे असतानाही निर्भया कांड किंवा कोपर्डीसारख्या अमानुश घटना घडताना दिसून येतात. यावर उपाय म्हणुन महिलांना स्वायत्तता सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरण अभियान राबवले जाते. प्रत्येक यषस्वी पुरुशामागे स्त्रीचा सहभाग असतो. अनेक महापुरुश स्त्रीमुळे घडले. राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, मदर टेरेसा, सरोजिनी नायडु, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, पी.टी. उशा, मॅगसेस पुरस्कार प्राप्त मंदा आमटे यांचे आदिवासी भागातील आरोग्य सेवेचे कार्य, भारतरत्न पुरस्कार प्राप्त ख्यातनाम गायिका लता मंगेषकर, अनाथांची माय सिंधुताई सपकाळ अषा कितीतरी महिलांनी देषाचा नावलौकिक वाढविला आहे. मुळातच महिलांमध्ये निसर्गतः काही देणग्या पुरुशांपेक्षा जास्त आहेत. सहनषिलता, स्मरणषक्ती, बचतवृत्ती, वात्सल्याची जाणीव हे गुण निसर्गतःच अधिक आहेत. त्यामुळे स्त्री मुळातच सबला आहे. जरी संविधानाने स्त्री व पुरुश यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या पुरुशप्रधान संस्कृतीमुळे स्त्री आज समाज व कुटुंबाच्या बंधनात अडकून पडली आहे. महिला सबलीकरणाच्या दृश्टीने महिलांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करुन वैयक्तिक स्वातंत्र्य व निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे आवष्यक आहे.

देशातील अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. महिला सबलीकरणासाठी मातृदिवस, महिलादिन, बालिकादिन, जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबविले जातात. त्यातून स्त्री जागृतीचे काम केले जाते. महिला सबलीकरण करताना हुंडा प्रथा, स्त्री भ्रुणहत्या, निरक्षरता, अत्याचार अषा विघातक प्रवृत्तीचा नाष करणे आवष्यक आहे. तसेच सामाजिक, घरगुती अन्याय व अत्याचार या विरुध्द कठोर कायदे करणे, महिलांना षारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरुपात

सषक्त बनवणे. असा विचार प्रवाह समाजात रुजला तर महिलांचे सबलीकरण होईल. सबलीकरणाच्या दृश्टीने स्त्रीषक्तीचे आरोग्य, षिक्षण, संस्कार, स्वावलंबन भक्कम केले तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल. महिला स्वावलंबी व स्वयंपुर्ण व्हाव्यात यासाठी षासनाने अनेक योजना राबविल्या आहेत.

महिला सबलीकरणासाठी षासन नेहमीच प्रयत्न करत असते. महिला स्वावलंबी व स्वयंपुर्ण व्हाव्यात, त्यांचा विकास व्हावा यासाठी अनेक योजना षासन राबवत आहे.

**1) विद्यापीठ व महाविद्यालयात महिलांसाठी 30 टक्के आरक्षणः**

महाराश्ट्रातील सर्व विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी महिलांना 30 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मुलींसाठी सैनिकी षाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. षासकीय कागदपत्रामध्ये वडिलांसोबत आईच्या नावाचा उल्लेख केला जात आहे. महिलांसाठी सावित्रीबाई फुले योजना, मातृत्व अनुदान, स्त्री डॉक्टरच्या सेवा अषा अनेक योजना महिला विशयक धोरणात जाहीर केल्या आहेत.

**2) निराधारांसाठी आधारः**

स्वयंसेवा संस्थामार्फत महिलांसाठी आधारगृहाची निर्मिती करण्यात आली. घराचे भाडे, औशध याबाबत साहित्य दिले जाते. महिलांचा सांभाळ करणार असे कोणी नाही त्यांना आश्रय देवुन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्यगृहे स्थापन केलेली आहेत. परित्यक्ता, कुमारी माता, संकटग्रस्त, महिलांना आश्रय देण्यासाठी आश्रयस्थान उपलब्ध करुन दिलेले आहेत. अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय करुन प्रषिक्षण, षिक्षण व कायदेषीर मार्गदर्षन केले जाते.

**3) बालिका समृध्दी योजनाः**

केंद्रसरकारच्या या योजनेअंतर्गत दोन मुलीसाठी अर्थसहाय्य दिले जाते. ग्रामीण तसेच षहरी भागात ही योजना राबवली जाते. त्यांच्या नावे राश्ट्रीय बचत योजना, सार्वजनिक भविश्य निर्वाहनिधी या योजनेत हा निधी गुंतविला जातो. व दरवर्शी षिश्यवृत्तीच्या रुपाने त्यांना लाभ दिला जातो.

**4) इंदिरा गांधी महिला संरक्षणः**

पीडीत महिलांसाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. पीडीत महिलांचे पुनर्वसन होईपर्यंत मानधनाच्या स्वरुपात मदत केली जाते.

**5) देवदासी योजनाः**

ज्या देवदासी असतात त्यांच्या मुलींना विवाहासाठी दहा हजार रुपये इतके अनुदान दिले जाते. त्यांना षिक्षणासाठी प्रोत्साहित करुन 500 ते 600 रुपयापर्यंतचे अनुदान दिले जाते.

**6) व्यवसाय प्रषिक्षण योजनाः**

15 वर्शावरील महिलांना व्यवसायिक प्रषिक्षण देणे. या योजनेचा फायदा निराधार महिला तसेच विधवा महिलांना त्याचा फायदा घेता येतो.

**7) सुवर्ण जयंतीग्राम स्वयंरोजगार योजनाः**

षहरी भागातील महिलांसाठी ही योजना राबविली जाते. आर्थिकदृश्टया दुर्बल असलेल्या महिलांना स्वयंरोजगाराद्वारे आर्थिक मदत केली जाते. बचत गटाच्या माध्यमातून अर्थसाहाय्य करणारी महिला स्वालंबन योजना राबविते. आर्थिकदृश्टया महिला स्वावलंबी व्हाव्यात या योजनेचा हेतु आहे.

**8) महिला बचत गटः**

महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठी षासन मदत करत असते. बचत गटामुळे महिला अभ्यासू, बोलक्या होऊन दुःखामधुन सावरण्याची त्यांना षक्ती मिळते. जिद्द, मेहनत, धाडस या बळावर उदयोग व्यवसायातून महिलांना यष मिळवता येते.

**निश्कर्शः**

महाराश्ट्राबाबत विचार केल्यास आजही स्त्रियांवरील अन्याय व अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. बलात्कार, हुंडाबळी, जुलुम, लैगिंक छळ व विनयभंग, वाढत असल्याचे नॅषनल क्राईम्स रिसर्च ब्युरोने मत व्यक्त केले आहे. साक्षरतेचे प्रमाण वाढले असले तरी मुलींचा षिक्षणातील सहभाग कमी असल्याचे दिसुन येते. लहान वयातील विवाह आणि मातृत्वाची जबाबदारी यामुळे अर्धवट षिक्षण सोडावे लागते. महाराश्ट्रातील राजकारण व राजकीय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग हा स्त्री सबलीकरणाचा महत्वाचा टप्पा म्हणावा लागेल. महाराश्ट्राने आज 73 व 74 व्या घटनादुरुस्तीने पंचायत राजमध्ये 50 टक्के आरक्षण दिले आहे यामुळे स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे. अषा प्रकारे स्त्रियांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढल्याषिवाय स्त्री सबलीकरणाचा अपेक्षीत अर्थ वास्तवात दिसून येणार नाही. त्यासाठी स्त्रियांना अधिकाराची जाणीव करुन देणे. षासकीय व स्थानिक पातळीवर स्त्री सबलीकरणासाठी गतीमान प्रयत्न करणे. असा लढा उभारल्याषिवाय स्त्रियांसाठी अनुकुल वातावरण तयार होणार नाही. कारण आर्थिक, प्रषासकीय, राजकीय, सामाजीक, आरोग्य, षिक्षण इत्यादी क्षेत्रातील स्त्री सबलीकरणाषिवाय विकसीत भारताचे स्वप्न पुर्ण होणार नाही.

**संदर्भः**


1. भारतीय समाज और नारी : षोभा नाटाणी
2. जिल्हा माहिती कार्यालय : कविता फल्ले–बोरीकर
3. स्थानिक स्वराज्य संस्था : गोविंद यमलवार
4. स्त्री आणि राजकारण : प्रषांत अमृतकर